Printing Area
UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal

# Printing Area

Special Issue
April-2018
International Multilingual Research Journal
ISSN 2394-5303



## Father of Indian Constitution : Dr. Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

26) डॉ. आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान
**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे, सोनपेठ** || 93

27) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विचार – एक अध्ययन
**डॉ.राजेश्री एन.कडू, सावरगांव** || 95

28) स्त्री उध्दारक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर
**डॉ.उत्तम देवकते, राणीसावरगाव** || 98

29) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर
**डॉ. निलीमा चौव्हान, नागपुर** || 100

30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिलासक्षमीकरण विषयक कार्याचे ऐतिहासिक अध्ययन
**प्रा.डॉ.सुरेश ल. पंडित, खडकी, अकोला** || 103

31) विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार : एक दृष्टिक्षेप
**प्रा.डॉ.सुधा मु.खडके (कडू), यवतमाळ** || 105

32) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपेक्षित लोकशाही
**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) सोनपेठ** || 109

33) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मनुचे स्त्री विषयक विचार एक तुलनात्मक अध्ययन
**प्रा. सुचित्रा शरद ताजणे, मुंबई** || 112

34) भारतीय अर्थव्यवस्था तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर के आर्थीक विचार
**प्रा. डॉ. सुनील जि. नरांजे, चंद्रपूर** || 116

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
**कु. हेमलता आनंदराव उराडे, कुरखेडा** || 119

36) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
**श्री संजय मारोतराव महाजन, कुरखेडा** || 123

37) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्त्री
**प्रा डॉ.साधना डी. वाघाडे, जवाहरनगर** || 125

38) जाती व्यवस्था आणि स्त्री शोषणाची परंपरा
**प्रा. रिता धांडेकर, सक्करदरा चौक, नागपूर** || 130

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com


UGC Approved Jr.No.43053

**26**

# डॉ. आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी

=============***********===============

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशासाठी , समाजासाठी आणि स्त्रियांसाठी महानकार्य करुन राष्ट्रनिष्ठा व सामाजिक बांधीलकी जपणारे एक आदर्श व्यक्तिमत्व होते. स्त्री - पुरुष भेद अमान्य करुन स्त्री - पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह म्हणजे स्त्रीवाद होय, स्त्रियांचे ऐतीहासीक दुय्यमत्व प्रकाशात आणुण ती संपविणारी चळवळ होय. जगातील इतर स्त्रियांप्रमाणच भारतीय स्त्रियांचेही दमन केले गेले. शतकापुर्वीच्या त्या खडतर काळातील इतर सामाजिक सुधारकांप्रमाणे डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांची सामाजिक , शैक्षणीक व आर्थीकस्थिती सुधारण्यासाठी लढा दिला. डॉ. आंबेडकरांचे स्त्रिवादी विचार पुरोगामी व आधुनिक असुन त्यांची गरज व महत्व आज जवळ जवळ एका शतकानंतरही समाजाला तेवढेच आहे. यावरच त्यांचा दृष्टेपणा सिध्द होतो. 'स्त्रियांच्या मनावर परंपरेचा पगडा जास्त असतो, त्यामुळे त्यांच्यात मनोदुर्बलता निर्माण होते, ती त्यांनी काढुन टाकली पाहिजे.' 'आजच्या जगात संपत्तीच स्वतंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा हक्क मिळत नाही तोवर त्यांची गुलामगीरी संपणार नाही.' 'महिलांनी लवकर लग्न करणे', 'वैवाहीक स्त्रियांनी जास्त मुले होऊ देणे हा गुन्हा आहे', 'नवज्याच्या मालमत्तेत संपूर्ण मालकी त्यांच्या पत्नीलाचा मिळाली पाहीजे, बाप मेल्यावर भावाबरोबर त्यांच्या बहिणीला ही का वाटणी मिळू नये ?' अशा प्रकारे सशक्त व क्रांतीकारी विवार आपल्या भाषणातुन व लिखानातुन मांडून त्यांनी मुलतत्वद्यांशी नेटाने लढा दिला.

**शोधनिबंधाचा उद्येश :**

१) डॉ. आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार जाणुन घेणे.

२) डॉ. आंबेडकरांचे जाती संदर्भातील विचारांची मांडणी करणे.

३) हिंदु कोड बिलातील तरतुदी जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी दुय्यम साधनांच्या आधारे केलेली आहे. यासाठी संदर्भपुस्तके , मासीके , वृतपत्रे , इंटरनेट, इ. मदतीने निबंधाची मांडणी केलेली आहे.

डॉ. बाबासाहेब हे स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते त्यांच्यावर गौतम बुध्दांच्या शिकवणीचा व महात्मा फुलेंच्या कार्याचा प्रचंड प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुध्द हेच स्त्रीस्वराज्याचे आद्य पुरस्कर्ते होते. बुध्दांनी समानतेचा उपदेश दिला व तो आमलात आणला . जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रुपा कुलकर्णी - बोधी यांच्या मते ' भारतीय स्त्रीमुक्तीची खरी वैचारीक बैठक भगवान बुध्दांच्या भक्कम अशा समतावादी तत्वज्ञानाच्या पायावर उभी आहे, बाहेरुन आयात केलेल्या एखाद्या जेंडर बेस्ड विचारावर नाही ! आणि कायद्याऐवढे बाबासाहेबांचे महत्वांचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली ही शुध्द भारतीय बैठक !' बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मुल्यमापन त्या समाजातील स्त्रियांची परीस्थिती कशी आहे, यावरुन करता येते. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांची ही समग्र प्रगती होणे गरजेचे आहे हे भान त्यांना विद्यार्थी दशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने आपल्या घरातील समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा असे त्यांचे ठाम मत होते. भारतीय समाजव्यवस्थेत रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणांज्या बाबासाहेबांना स्त्रीयांवर होणारे अन्याय आत्याचार स्वस्थ बसु देत नव्हते. पितृसत्ताक संस्कृतीचा भारतीय समाजावरील पगडा ही त्यांच्या लक्षात येत होता. स्त्रियांचे बाळवचन , मनाविरुध्द होणारे विवाह व त्यांच्यावर बळजबरीने लादलेली बाळांतपणे याचाही परिणाम त्यांना दिसत होता. ही परिस्थीती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय हा विचार त्यांनी आपल्या विचारातुन व लेखनीतुन मांडला.

डॉ. आंबेडकरांनी शिक्षण हे सामाजिक जाणीवेचे साधन मानले ते म्हणतात "उपासमारीने शारिराचे पोषण कमी झाल्यास माणुस हतबल होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावाने तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणे दुसज्याचा गुलाम बनतो." शैक्षणिक सवलतीच्या धोरणाविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात 'दोन मानसे सुदृढ असतील तर एखाद्याला मलिदा व दुसज्याला कोंडा देणे कधीच रास्त होणार नाही. पण एकरोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त ठरेल "

असमांनाला समान पातळीवर आनायचे असेल तर असमानांना विशेष सवलती दिल्या पाहिजेत, असे त्यांना अपेक्षीत होते. म. फुले यांचा 'एवढे सारे अनर्थ एका अविद्येने केले' हे सुत्र आंबेडकरांना मान्य होते म्हणूनच त्यांनी बहिष्कृत समाजाला 'शिका संघटीत व्हा संघर्ष करा हा मुलमंत्र दिला. ' आंबेडकरांनी जीवनात शिक्षणाला सर्वाधिक महत्व दिले. शिक्षण हे सामाजिक परीवर्तनाचे साधन मानले. त्यांनी मुला -मुलींच्या प्राथमिक शिक्षणावर भर दिला. शिक्षणावर शासनाने अत्याधिक खर्च करावा व ते खालच्या स्तरापर्यंत पोचले पाहिजे. तसेच मागास विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व वस्तीगृहाची आवश्यकता दर्शविली .

डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचे सखोल अध्ययन केले, त्यावर 'हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनती' हा लेख लिहीला. स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्याचा एकमेव मार्ग स्त्रीशिक्षण सांगीतला. स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे स्थान मिळावे यासाठी ' हिंदु कोडबील' मांडले. सामाजिक समतेच्या अंदोलनात स्त्री पुरुष समानता यावर फुल्यांनी भर दिला तेवढाच भर डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीच्या, पर्यायाने महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात 'हिंदु कोडबिलाच्या रुपाने दिलेला होता. कर्मकांड, अंधश्रध्दा दुर सारण्याच्या कामी स्त्रीच पुढाकार घेवू शकते यावर त्यांची प्रगाढ श्रध्दा होती.' स्त्रियांना पुरुषांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात समान स्थान व समानदर्जा, हक्क मिळावा यासाठी कायद्याची तरतुद करुन त्यांनी स्त्रीदास्य विमोचन केले. त्यांचे कार्य केवळ दलीत पद्दलीत स्त्रियापुरतेच मर्यादीत नाही तर या देशातल्या तमाम हिंदु स्त्रियांच्या उध्दारादाचे व्रत त्यांनी घेतले होते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे हिंदु कोडबील होय . हिंदु कोड कायद्याचे संहतीकरण करुन त्यामध्ये हिंदु स्त्रियांना समान हक्क देण्याच्या उद्येशाने तत्कालीन केंद्र सरकारने १९४१ मध्ये हिंदु कोडबिल समिती नेमली होती. परंतु पारंपारीक मानसीकतेमुळे या समितीच्या शिफारशींना यश आले नाही. पुढे १९४४ मध्ये या समितीचे सरकारने पुनरुज्जीवन केले त्यावेळी या समितीचे अध्यक्ष बनेगल नसिंगराव हे होते. म्हणून ही कमिटी राव कमिटी म्हणून ओळखली जात होती परंतु यावेळी डॉ. आंबेडकर कायद्यामंत्री असल्यामुळे हिंदु कोडबिल नव्याने करण्याचे प्रमुख कार्य त्यांच्याकडे आले होते. यासाठी त्यांनी 'हिंदु कोडबील' तयार करण्यासाठी खुप महेनत घेतली. घटस्फोट देण्याचा अधिकार, पोटगी मागण्याचा अधिकार, एकपत्नी असतांना दुसरी पत्नी करण्याच्या मनाईचा अधिकार, दत्तक घेण्याचा अधिकार, वडीलोपार्जीत स्वतःच्या मिळकतीवरील अधिकार, मुलीला वारस घेण्याचा अधिकार, आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार स्वतःच्या वारसा निश्चित करण्याचा अधिकार इ. अधिकार स्त्रियांना प्राप्त होऊन त्यांच्यावरील अन्याय या बिलाव्दारे नष्ट होणार होते. स्त्रियांचा दर्जा उंचावणारा होता परंतु हे बिल पास होऊ शकले नाही. हिंदु कोड बिलाला अपयश आले असले तरी त्यामुळे जागृती निर्माण झाली होती. पुढे सरकारला या बिलाचे निरनिराळे भाग करून त्यात थोडेफार फेरफार करुण नवीन चार कायद्याच्या रुपात तुकड्या तुकड्याने हे बिल पास करावे लागले. ते म्हणजे १९५५ चा हिंदु विवाह कायदा , १९५६ चा हिंदु वारसा कायदा, अज्ञानत्व व पालकत्व कायदा, दत्तक पोटगी कायदा इ. या कायद्यामुळे स्त्रियांच्या जीवनात, त्यांच्या दर्जात अमुलाग्र बदल झाले.

**सारांश :**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजाला मानवतावादी दृष्टीकोनातुन, दलितवादी दृष्टीकोनातुन समाजशास्त्रीय अभ्यास केला . भारतीय समाजातील जातीव्यस्था ही मानव निर्मीत आहे, अशी त्यांची ठाम धारणा होती.स्त्रियांच्या हक्क व अधिकारासाठी त्यांनी वैचारीक लढा दिला. स्त्रिया इतर जातीतील असल्यातरीही वास्तविकतः त्याही दलीतच आहेत अशा संपूर्ण स्त्रीजातीस व दलीत समाजाच्या ऊत्थानासाठी प्रीत करणारे , घटनात्मक तरतुदींना बळकटी देणारे आणि शिक्षणाशिवाय समस्त मानवजमातीचा विकास शक्य नाही, याची वारंवार जाणीव करुन देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक थोर समाजशास्त्रज्ञच आहेत.

**संदर्भसूची :**


१) प्रा. शेख, प्रा.भद्रशेटे, प्रा. भालेराव, समाजशास्त्रीय विचारवंत अरुणा प्रकाशन , लातुर अक्टोबर २०१०, पृ.क्र.१५२ ते १५७

२) प्रा. ज्योती डोईफोडे , मुलभुत सामाजिक विचार, विद्याबुक्स पब्लीशर्स, जुन २००५ पृ.क्र. २५६,२६४.

३) डॉ. ना.य. डोळे, प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत विद्याबुक्स पब्लिर्शस, औरंगाबाद , जुन १९९९ प्र.क्र. ६८, ६९.

४) डॉ. प्रदिप आगलावे , मुलभूत समाजशास्त्रीय विचार , साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुन २०१४, पृ.क्र. १५० ते १५१

५) प्रा. थोरात, प्रा. देसले (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतीग्रंथ , बंहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर, २०१६, पृ.क्र. ७, ८, ९

६) लोकराज्य डिसेंबर २०१५, पृ.क्र. १५

७) दै. सकाळ, सप्तरंग, २३ नोंव्हे २०१४


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani